# अनेक पोलीस अधिकाऱ्यांच्या बदल्यांचा आदेश अधिवेशनामध्ये अचानक निघू शकतो ?


अन्याय, अत्याचार, भ्रष्टाचाराचा कर्दनकाळ

सायं.दैनिक महाराष्ट्र

**आरंभ**

संपादक : दिपक थोरात Mob.9860898564

■ बीड (महाराष्ट्र) ■ सायं.दैनिक ■ मराठी ■ वर्ष – ०२ ■ अंक – १७३ ■ मंगळवार दि.११ मार्च २०२५ ■ आरएनआय – एमएएचएमएआर/२०२३/८३९६५ ■ किंमत ३ रू. । पाने ४

■ Beed (Maharashtra) ■ Daily Evening ■ Marathi ■ Year - 02 ■ Issue - 173 ■ Tuesday Dt. 11 March 2025 ■ RNI : MAHMAR/2023/83965 ■ Price - 3 Rupees ■ Pages 4




# पोलिस अधिक्षक नवनीत काँवत यांनी सगळेच काळेबेरे धंदे बंद करत पोलिस दलात पोलिसिंग आणली

## वाल्मीक कराडच्या अनेक खातेदार म्हणजेच पोलीस अधिकाऱ्यांना आता बीड जिल्ह्याच्या बाहेरचा रस्ता गृहमंत्री दाखवणार?






बीड । प्रतिनिधी

ज्या आकाचा (वाल्मीक कराड) वरदहस्त मिळवून परजिल्ह्यातून मोठ्या अट्टहासाने बीड जिल्ह्यात पोस्टींग आणि पोलिस ठाणे प्रभारीपद मिळविले त्याच अधिकाऱ्यांना आता बीड नको वाटायला लागले आहे. आका कोठडीत, वाळू चोरी बंद, पोलिस अधीक्षक कडक आल्याने अवैध धंदेही बंद पडल्याने काही पोलिस अधिकाऱ्यांमध्ये एक प्रकारची हतबलता आल्याचे चित्र आहे. जिल्ह्यातून साधारण १०० पोलिस अधिकाऱ्यांनी बदल्यांसाठी अर्ज केले आहेत. यात तब्बल ८४ अधिकाऱ्यांनी विनंती बदल्यांसाठी अर्ज आहेत हे विशेष. पाठीशी कोणी 'वाली'च नसल्याने आता बीड बरस्स अशी मानसिकता काही अधिकाऱ्यांची झाली आहे. दरवर्षीच वार्षिक विनंती व प्रशासकीय बदल्यांसाठी अर्जांची संख्या याच्या निम्म्याने असते. परंतु, ज्या पाठीराख्याच्या मध्यस्थीने जिल्ह्यात पाय ठेवला आणि चांगल्या पोलिस ठाण्याचे (ज्या भागात वाळू घाट, इतर अवैध धंदे) प्रभारीपद मिळविले तोच आता कारागृहात असल्याने अशांनाही जिल्हा नकोसा झालाय हे विशेष.



■ सरपंच संतोष देशमुख हत्यानंतर जिल्ह्यातील कायदा व सुव्यवस्थेचा मुद्दा चव्हाट्यावर!

■ पोलिस अधीक्षक नवनीत काँवत यांनी सगळेच 'काळे–बेरे' धंदे बंद करत पोलिस दलात पोलिसींग आणली!

■ बीड जिल्ह्यातील पोलिस अधिकाऱ्यांनी बदलीसाठी केले विनंती अर्ज

■ पाठीशी 'वाली' नाही, वाळूसह अवैध बंद; म्हणून पोलिस अधिकाऱ्यांना नकोय बीड

■ पाठीशी कोणी 'वाली'च नसल्याने आता बीड बरस्स अशी मानसिकता पोलीस अधिकाऱ्यांची

■ पोलिस अधिकारी वाल्मीक कराडच्या इशाऱ्यावर वागत होते

■ वाल्मीक कराडांचे इशारे काही पोलिस अधिकाऱ्यांसाठी ठरत होते महत्वाचे?

■ बीड जिल्ह्यातील पोलिस अधिकारी वाल्मीच्या शब्दाबाहेर नव्हतेच?

■ पोलिस दलातील अशा अधिकाऱ्यांवर टिकेची उडाली झोड?

सरपंच संतोष देशमुख यांचे अपहरण करुन निर्घुण हत्येच्या घटनेनंतर जिल्ह्यातील कायदा आणि सुव्यवस्थेचा मुद्दा चव्हाट्यावर आला. याच घटनेच्या अनुषंगाने काही पोलिस अधिकारी वाल्मीक कराडच्या इशाऱ्यावर कसे वागत होते, याचे पुरावेही समोर आले. उदाहरण म्हटले तर, मस्साजोगच्या पवनचक्की प्रकल्पावर ता. सहा डिसेंबरला मारहाणीची घटना घडली. परंतु, याचा गुन्हा खुनाच्या घटनेनंतर नोंदला गेला. संतोष देशमुख यांचे अपहरण केल्यानंतर गावकरी ठाण्यात जाऊन बसले तर गुन्हा खुन झाल्यानंतरच दाखल झाला. वाल्मीक कराड पक्ष कार्यालयात आल्यानंतर त्याच ठिकाणी विनाकारण वर्दीवर फिरणारा अधिकारीही आढळला. परळीत सव्वा वर्षांपूर्वी झालेल्या महादेव मुंडे यांच्या खुनाचा अद्याप तपास झाला नाही. तर, खुद्द जिल्हाधिकाऱ्यांनी पकलेले वाळू वाहतूक करणारे हायवा पोलिस मुख्यालयातून काढून देण्यातही हातभार लावणारी मंडळी पोलिस दलात आहे.

अशा एक ना अनेक बाबींत वाल्मीकचे इशारे काही पोलिस अधिकाऱ्यांसाठी किती महत्वाचे होते हे सिद्ध होते. सत्तापक्षातील आमदारांनीही अनेक अधिकाऱ्यांची नावे घेऊन त्यांचे आणि वाल्मीक कराडचे सुमधून संबंध समोर आणले. काही अधिकाऱ्यांनी तर ठाण्याला पक्षाचे कार्यालय केले.

याच काळात परळीतील राख माफियागीरीही समोर आली. जर, जिल्ह्यातील पोलिस अधिकारी वाल्मीच्या शब्दाबाहेर नव्हते तर परळीतल्या अधिकाऱ्यांकडून वेगळी अपेक्षा कशी. आता त्यांनाही परळी नको.

वाळूचा काळाबाजार चलणाऱ्या गेवराई पोलिस ठाणे किंवा स्थानिक गुन्हे शाखा मिळविण्यासाठी 'वाट्टेल ते' करणाऱ्या अधिकाऱ्यांनाही आता बीड नकोसे झाले आहे.

संतोष देशमुख हत्येच्या घटनेनंतर पोलिस दलातील अशा अधिकाऱ्यांवर टिकेची झोडही उठली. यातील अनेक आरोपांत सतत्यताही आढळली. दरम्यान, आता विनंती बदल्या मागण्यामागे वरदहस्त आत आणि एसपी नवनीत काँवत खमक्या आल्याने काही मंडळींचे हातच बांधल्यासारखे झाले आहेत. पण, आता नवनी पोलिस अधीक्षक नवनीत काँवत यांनी सगळेच 'काळे – बेरे' धंदे बंद करत पोलिस दलात पोलिसींग आणली आहे. त्यामुहे जिल्ह्यात राहून तरी उपयोग काय, अशी काही अधिकाऱ्यांची भावना झाल्याने त्यांनीही काढता पाय घ्यायचे ठरविले आहे.

"

अधिवेशनात कोणत्याही क्षणी संतोष देशमुख हत्याप्रकरणी बीड जिल्ह्यातील कायदा सुव्यवस्था चव्हाट्यावर आलेली आहे त्यामुळे आता राज्याचे गृहमंत्री व मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे बीड जिल्ह्यातील अनेक पोलीस अधिकाऱ्यांच्या बीड जिल्ह्याच्या बाहेर बदल्या करण्याची दाट शक्यता वर्तवली जात आहे त्यामुळे अनेक पोलीस स्टेशनच्या प्रभारी पोलिस अधिकारी यांची आता बीड जिल्हा पोलीस दलातून उचल बांगडी होऊन इतर जिल्ह्यांमध्ये बदली होण्याची शक्यता आहे कारण अनेक पोलीस अधिकारी हे तत्कालीन एसपी नंदकुमार ठाकूर अविनाश बारगळ यांना सलुट मारण्याच्या अगोदर ते वाल्मीक करांच्या दरबारामध्ये जाऊन वाल्मीक करायला सॅल्युट मारत होते व आर्थिक तोडजोड करून संबंधित पोलीस स्टेशन घेत असल्याची चर्चा अमलात आल्यानंतर संतोष देशमुख हत्या प्रकरणाने महाराष्ट्र हादरला आहे त्यामुळे विरोधकांचे आरोप प्रत्यारोपाच्या फेरी सहन करण्याच्या अगोदर गृह विभागाकडून संबंधित पोलीस अधिकाऱ्यांना बीड जिल्हा सोडण्यासाठी आपणच विनंती अर्ज बदलीचा द्या आणि इज्जती मधून जा व बीड जिल्हा सोडा अन्यथा आपणही गोत्यामध्ये येतात अशी समज वरिष्ठ पोलीस अधिकारी व गृह मंत्रालयाकडून मिळाल्याची माहिती सध्या सुत्रांनी सांगितले आहे. बीड पोलीस दलातील अधिकारी कर्मचाऱ्यांमध्ये चर्चा सुरू आहे त्यामुळे अनेकांनी बीड जिल्ह्यात ड्युटी नको म्हणून बदलीचे विनंती अर्ज दिलेले आहेत व नवनीत कॉवत यांच्या कार्यकाळामध्ये दोन नंबरचे धंदे बद राहिले असल्यामुळे पोलीस अधिकाऱ्यांना आता बीड जिल्ह्यामध्ये कमाई राहिलेले नाही काळे धंदे बंद झाल्यामुळे अनेक पोलीस अधिकारी बीड जिल्ह्यामध्ये नको म्हणून आता विनंती अर्ज करत आहेत परंतु कोणत्या दिशेने बीड जिल्ह्यातील अनेक पोलीस अधिकाऱ्यांच्या बदल्या बीड जिल्ह्याच्या बाहेर होणार असल्याची चर्चा सध्या जोर धरू लागली आहे?

# आ.मुंडेंचे सीडीआर, सीसीटीव्ही तपासा

## त्यांच्यासह १० जणांना सहआरोपी करण्याची दमानियांची मागणी

बीड । प्रतिनिधी

संतोष देशमुख हत्या प्रकरणात सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानिया या सातत्याने मंत्रीपदावरुन पायउतार झालेले राष्ट्रवादी काँग्रेसचे (अजित पवार) नेते धनंजय मुंडे आणि खंडणी, हत्येच्या आरोपात अटकेत असलेला वाल्मिक कराड याच्याविरोधात आक्रमक पवित्रा घेताना दिसत आहेत. या प्रकरणात अखेर धनंजय मुंडे यांचा राजीनामा झाला आहे. त्यानंतर आता अंजली दमानियांची मागणी आहे की, धनंजय मुंडे यांना सहआरोपी करा. धनंजय मुंडेचे सीडीआर, टॉवर लोकेशन, सीसीटीव्ही तपासा अशीही मागणी दमानियांनी केले.

यावेळी बोलताना अंजली दमानिया म्हणाल्या की, संतोष देशमुख अपहरण, खंडणी, हत्या हे सर्व धनंजय मुंडे यांना माहीत होतं. त्यांच्या बंगल्यावरच खंडणीची बैठक झाली होती. या बैठकीत २ पोलीस कर्मचारी देखील सहभागी होते. मात्र आरोपपत्रात त्यांचं नाव नाही. धनंजय मुंडे यांच्या सांगण्यावरून तीन माणसं काम करत होती, असा गंभीर आरोप दमानिया यांनी धनंजय मुंडे यांच्यावर केला आहे.

मुंडेंवर आरोप करताना धनंजय मुंडे, बालाजी तांदळे, शिवलिंग मोराळे, सारंग आंधळे, डॉ.





वायबसे आणि त्यांची पत्नी, एसपी बारगळ, पीएसआय राजेश पाटील, पीआय भागवत शेलार, पीआय महाजन आणि गीते एलसीबीचे अधिकारी १० जणांना सहआरोपी करुन जबाब नोंदवा, अशी मागणी अंजली दमानिया यांनी केली. बालाजी तांदळे याला सांगण्यात आलं होतं की, ९ तारखेपासून तांदळे हा पोलिसांबरोबर फिरत होता. हे प्रकरण शेकायला लागलं, तेव्हा तो आरोप कराड किंवा त्यांच्यापर्यंत पोहोचू नये, यासाठी या लोकांना अटक करुन तिथल्या तिथे निपटवा. यासाठी धनंजय मुंडे प्रयत्न करत होते, असा गंभीर आरोपच दमानिया यांनी यावेळी केला आहे. मी धनंजय देशमुख यांच्या नातेवाईकाशी बोलले तेव्हा मला बालाजी तांदळेविषयी समजले. आरोपींना पोलिसांनी नाही तर आम्ही शोधल्याचे बालाजी तांदळे त्यांना म्हणाला होता. त्यामुळे धनंजय मुंडे हे बालाजी तांदळे याच्यावर प्रचंड संतापले होते. धनंजय मुंडे हे बालाजी तांदळेला म्हणाले की, 'तू जास्त बोलला म्हणून मला त्रास होतोय'. धनंजय मुंडे यांना सगळ्याची कल्पना होती, असे अंजली दमानिया यांनी म्हटले.

संतोष देशमुखांच्या हत्येचे प्रकरण आता बंद करण्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे गुप्त आदेश बीड पोलिसांना मिळाले असल्याचा आरोप मराठा आरक्षण आंदोलक मनोज जरांगे यांनी केले आहेत.

आज झालेल्या पत्रकार परिषदेत जरांगे म्हणाले, धनंजय मुंडे फक्त सहआरोपीच नाही तर ३०२ मध्ये देखील धनंजय मुंडे आहे. या प्रकरणात आणखी गोष्टी बाहेर येणार आहेत. यांच्या सरकारी बंगल्यावर बैठका झाल्याचे समोर आले आहे. आता थांबवावं लागणार नाही. धनंजय मुंडे देखील ३०२ मध्ये आहे. फक्त फडणवीसांनी या तपासाला फुलस्टॉप लावला आहे. सीआयडी, एसआटी, स्थानिक पोलिस सगळ्यांना सगळं माहित आहे. असं मनोज जरांगे म्हणाले.


## सुप्रसिद्ध गायक शाहीर युवराज ढगे राज्यस्तरीय उत्कृष्ट गायक शाहीर पुरस्काराने सन्मानित



बीड । प्रतिनिधी

रयत सामाजिक प्रतिष्ठान महाराष्ट्र राज्य बीड यांच्या वतीने दरवर्षी प्रमाणे ह्या वर्षी ही दिं,०९/०३/२०२५ रविवार रोजी बीड इथे पुरस्कार वितरण सोहळा हाजारोच्या संख्येत पार पडला त्या वेळी सुप्रसिद्ध गायक शाहीर युवराज ढगे हे अनेक वर्षांपासून पुर्ण महाराष्ट्र भर समाज प्रबोधन व प्रबोधनात्मक गीत गायनाचे कार्यक्रम समाजाच्या सेवैत करत असल्याने सुप्रसिद्ध गायक शाहीर युवराज ढगे यांना आजुन पुर्ण महाराष्ट्रा मध्ये त्यांनच्या गीतांच्या माध्यमातून समाज सेवा करण्यासाठी बळ यावं म्हणून शाहीर युवराज ढगे यांना काल दिं,०९/ मार्च २०२५ रविवार रोजी उत्कृष्ट शाहीर पुरस्कार देऊन गौरविण्यात आले.

रयत सामाजिक प्रतिष्ठान यांच्या वतीने व त्या वेळी रयत सामाजिक प्रतिष्ठान च्या अध्यक्ष रोहीणी ताई गणेश माने व गणेश माने हे दोघिहि बोलत असतांना मटले की आम्ही जोपर्यंत आहेत सर्व क्षेत्रातील कलाकारांना व शैक्षणिक वैद्यकीय व महिला उद्योग विधीन्याय पत्रकारिता प्रशासकीय कृषी आणि सांस्कृतिक व आणेक क्षेत्रात करत असलेल्या सर्वांनाच उर्जा मिळावी मनुन मनुन हा पुरस्कार सोहळा प्रत्येक वर्षी मोठ्या उत्साहात होईल आसे आश्वासन दिले व सर्व पुरस्कार करत्यांना पुढिल वाटचालीस खुप खुप शुभेच्छा दिल्या व सुप्रसिद्ध गायक शाहीर युवराज ढगे यांना पुरस्कार दिल्या बद्दल आभार मानत आसतांना गायक युवराज ढगे मनाले की मला राज्यस्तरी उत्कृष्ट शाहीर पुरस्कार देऊन माझ्या वरती आजुन जबाबदारी जी टाकली आहे त्या बद्दल मी आजुन वैगानी समाज मध्ये जाऊन फुले शाहू आंबेडकर यांचे विचार पेरन्याचे मी एक नीस्ट राहुन सदैव समाज सेवा करील फक्त अपेक्षा करील की मला तुमची सेवा करायची संधी मीळो आता लवकरच दिं,१४ एप्रिल भीम जयंती एत आहे मला आपल्या गावात भीम जयंती निमित्त भीम गीतांचा कार्यक्रमासाठी मला ह्या नंबर ९१४५३०६९२१वरती कॉल करून मला निमंत्रित करताल आशी आपेक्षा करतो व पुन्हा एकदा रयत सामाजिक प्रतिष्ठान महाराष्ट्र राज्य बीड अध्यक्षा रोहीणी ताई व.गणेश माने यांचे खुप खुप आभार सुप्रसिद्ध गायक शाहीर युवराज ढगे यांनी मानले.



मा,आ,श्री कैलाशजी गोरंट्याल साहब (मा, आमदार जालना) ईनोने हामारे जनसंपर्क कार्यालय द्वारकाधीश भवन धोंडीपुरा बीड पर संदीच्छा भेट देतेसमयी श्री विजयजी चौधरी साहब (मा, नगरसेवक जालना) श्री कपीलजी श्रवनजी भुरीवाले साहब (मा, नगरसेवक जालना) मा,श्री लाड साहब और द्वारकाधीश मित्र मंडळ बीड.

## थेटेगव्हाण भिल्ल समाजाच्या मागण्या दुर्लक्षित केल्यास धारूर प्रशासनाला दणका दाखऊ : डॉ जितेंद्र ओव्हाळ

धारूर । प्रतिनिधी

थेटेगव्हाण च्या भिल्ल समाजाच्या विवीध मागण्या दुर्लक्षित केल्यास धारूर प्रशासनाला हिसका दाखऊ असा इशारा डॉ बाबासाहेब आंबेडकर विकास मंच अध्यक्ष डॉ जितेंद्र ओव्हाळ यांनी उपोषणकर्त्याची भेट घेऊन दिला पंचायत समिती पंचायत समिती प्रशासनाला चांगले धारेवर धरले. पंचायत समिती धारूर समोर सोमवार दि १० मार्च पासून शेकडो भिल्ल समाज बांधव पंचायत समिती व ग्रामपंचायत स्तरावरील मागण्या साठी उपोषणास बसले आहेत या उपोषण कर्त्याची डॉ जितेंद्र वाव्हळ यांनी भेट घेऊन त्याच्या हक्काच्या मागण्या दुर्लक्षित करणाऱ्या अधिकाऱ्यांना जाब विचारला या वेळी गटविकास अधिकारी वैजनाथ लोखंडे सहायक गटविकास धिका कांदे , ग्रामसेवक शिंदे सरपंच उपसरपंच उपस्थित होतें येत्या दोन दिवसात भिल्ल समाजाच्या मागण्या पूर्ण करा नसता आंदोलनाच्या माध्यमातून हिसका दाखऊ असा इशारा डॉ जितेंद्र ओव्हाळ यांनी या वेळी धारूर प्रशासनाला दिला.



## अमरसिह पंडित यांना विधान परिषदेवर संधी द्यावी : आकाश निकाळजे

बीड । प्रतिनिधी

बीड जिल्ह्यातील अभ्यासू नेतृत्व म्हणून अमरसिह पंडित यांच्याकडे



पहिले जाते. सदैव तळागाळातील जनते सोबत जोडली गेलेली नाळ ही त्यांनी कधीच तूटु दिली नाही. लोकांच्या सुख दुःखात सदैव सहभागी राहिले आहेत. अशा नेतृत्वाला विधानपरिषदवर संधी द्यावी, अशी मागणी गुळज नगरीतील राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी युवा नेते आकाश कल्याणराव निकाळजे यांनी केली आहे.

अमरसिह पंडीत यांचाकडून शारदा प्रतिष्ठानच्या वतीने सतत काम करत आलेले आहे. विवाह सोहळा आदर्श शिक्षण पुरस्कार कोविड काळामधे चालू केलेले सेंटर गावागावात होत असलेले बंधारे शिवछत्र परिवाराच्या वतीने अमरसिह पंडीत हे नेहमी गोरगरीबांच्या सेवेत असतात. नागरिकांचे प्रश्न मतदारसंघातला किवा बीड जिल्ह्यातला असो अडचण किव्हा काम घेऊन गेला आणि तो रिकाम्या हाताने परत आला नाही प्रत्येकाच्या सुख दुःखामधे सहभाग घेतलेला आहे शेतकऱ्यांचे प्रश्न असो पाण्याचा प्रश्न असो किवा आणखी कुठलेही प्रश्न अस प्रत्येक गोष्टीमध्ये ते अग्रेसर असतात म्हणून अशी व्यक्ती विधानभवनामध्ये आवाज उठवण्यासाठी आवश्यक आहे, अशी मागणी गुळज येथील राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी युवा नेते आकाश निकाळजे यांनी केली.

## बीड जिल्ह्यातील विकास कामांसाठी सर्वांना सोबत घेवून प्रयत्न करणार : खा.बजरंग सोनवणे

केज । प्रतिनिधी

बीड जिल्ह्यातील ग्रामीण भागात अनेक विकास कामे करणे आवश्यक आहे.अजूनही ग्रामीण भागात चांगल्या सुविधा मिळू शकल्या नाहीत. येणाऱ्या काळात आपल्याला आवश्यक ती विकास कामे करायची असून त्यासाठी सर्वांना सोबत घेवून विकासकामे करण्याचा प्रयत्न करणार आहे असे प्रतिपादन खा. बजरंग सोनवणे यांनी केले. खा.बजरंग सोनवणे यांच्या माध्यमातून केज तालुक्यातील विडा आणि गप्पेवाडी, गौरवाडी येथे विविध विकास कामांचे उद्घाटन करण्यात आले. यावेळी ते बोलत होते.

गप्पेवाडी येथील कार्यक्रमाला माजी आ.पृथ्वीराज साठे, केज पंचायत समितीचे माजी सभापती ज्ञानेश्वर चौरे, पंचायत समितीचे सदस्य पिंटू ठोंबरे, तालुकाध्यक्ष शंकर जाधव, विलास जोगदंड, अर्जुन केदार, अशोक केदार, पांडुरंग केदार, संतोष केदार यांच्यासह ग्रामस्थांची उपस्थिती होती. तर विडा येथील कार्यक्रमाला माजी आ.पृथ्वीराज



साठे, ह.भ.पश्रीराम महाराज विडेकर, सुदाम महाराज शास्त्री, संजय महाराज शिरुरकर, केज पंचायत समितीचे माजी सभापती ज्ञानेश्वर चौरे, पंचायत समिती सदस्य पिंटू ठोंबरे, तालुका अध्यक्ष शंकर जाधव, सरपंच सुरज पटाईत, उप सरपंच सदाशिव वाघमारे, उद्धव देशमुख, दिलीप पटाईत, उद्धव पटाईत, बाबासाहेब पटाईत, रणजित गुट्टे, दत्ता गुट्टे, जानमिया शेख आदी मान्यवर उपस्थित होते. तर गौरवाडी येथील विकास कामांच्या उद्घाटन कार्यक्रमास कार्यकारी अभियंता एम.एम.पाटील उपअभियंता के.बी शेख, बंडू चौधरी, रुपेश बोरगावकर, डॉ.संतोष ढाकणे, तानाजी घाडगे, विनोद घाडगे, महादेव घाडगे, प्रकाश रोमन आदी मान्यवर उपस्थित होते.

यावेळी पुढे बोलताना खा.बजरंग सोनवणे म्हणाले की, या दोन्ही गावातील नागरिकांनी माझ्यावर मोठा विश्वास मतातून दाखविलेला आहे. आज तुमच्याच आशीर्वादाने मी संसदेच्या सभागृहात जावू शकलो. तुम्ही तुमची जबाबदारी पुर्ण केली असून आता मी माझी जबाबदारी पुर्ण करण्याचा प्रयत्न करत आहे. येणाऱ्या काळात या भागाच्याविकासासाठी मला जे जे करावे लागेल ते मी करेल.ग्रामीण भागात विकास कामे करायला मोठी संधी आहे याच संधीचे सोने आपण करू आणि विकास कामांसाठी सर्वांना सोबत घेवून कामे करू असेही ते म्हणाले.

## गावठी पिस्टल घेऊन फिरणाऱ्यास अटक



बीड । प्रतिनिधी

दिनांक १०/०३/२०२५ रोजी इसम नामे ज्ञानेश्वर संजय सानप, वय २२ वर्ष, रा.वडझरी ता. पाटोदा जिल्हा बीड हल्ली मुक्काम जुना चऱ्हाटा रोड बीड हा स्वतःकडे एक गावठी पिस्टल कंबरेला लावून फिरत असले बाबत गोपनीय माहिती मिळाल्याने त्यास ताब्यात घेऊन त्याचेकडून एक गावठी पिस्टल जप्त करून पोलीस स्टेशन शिवाजीनगर येथे गुरन १३३/२०२५ कलम ३/२५ आर्म क्ट प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे. सदरची कारवाई मा.पोलीस अधीक्षक श्री.नवनीत कावत, मा.अप्पर पोलीस अधीक्षक श्री. सचिन पांडकर, मा.पोलीस निरीक्षक उस्मान शेख, स्थानिक गुन्हे शाखा, बीड यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक श्रीराम खटावकर, पोलीस हवालदार अशोक दुबाले, दीपक खांडेकर, सोमनाथ गायकवाड, बाळू सानप, नारायण कोरडे, विकी सुरवसे यांनी केली आहे.

# महामानव अभिवादन ग्रुपच्या अभियानाला उत्स्फूर्त मदतीचा हात

## आईचा स्मृतिदिनी विद्यार्थ्यांना वही पेन वाटप संपन्न

बीड । प्रतिनिधी

गरजू व होतकरू विद्यार्थ्यांना शालेय साहित्य (वही पेनचे) वाटप कार्यक्रम महामानव अभिवादन ग्रुप गेल्या तीन वर्षापासून राबवत आहे. त्या उपक्रमाला सुरेश ससाने यांनी आईच्या स्मृतिदिना प्रित्यर्थ जागतिक महिला दिनी गरजू व होतकरू एकूण ६० विद्यार्थ्यांना शालेय साहित्य सम्यक समबुद्ध विहार नागोबा गल्ली बीड येथे मान्यवरांच्या हस्ते वाटप करण्यात आले. या कार्यक्रमाप्रसंगी नागोबा गल्ली येथील ज्येष्ठ नागरिक शांताराम जोगदंड अध्यक्षपदी तर समता सैनिक दल कंपनी कमांडर सुजाता वासनीक ह्या प्रमुख पाहुण्या म्हणून लाभल्या होत्या. महामानव अभिवादन ग्रुप चे अध्यक्ष जी.एम.भोले. अँड.तेजस वडमारे,माजी नगरसेवक राजू जोगदंड, के.एस.वाघमारे, दिनकर जोगदंड, प्रशांत वासनिक याची प्रमुख उपस्थिती होती.

कार्यक्रमाचे प्रस्ताविक वाचाल तर वाचालचे डी.जि.वानखेडे यांनी केले तर सूत्रसंचालन डि.एम.राऊत यांनी केले. सर्वप्रथम मान्यवरांच्या हस्ते आदर्शाची पुष्प-दीप-धुपाने पूजन करून विनम्र अभिवादन करण्यात आले. प्रमुख पाहुण्या सुजाता वासनीक महिला दिनाचे औचित्य साधून महिला व मुलासी हितगुज साधताना म्हणाल्या कि मुलं - मुली लहानपणी आईच्या सहवासात जास्त असतात. तरी लहानपणीच पाल्यावर चांगले संस्कार केले तर आजचे बालक पुढे देशाचे उत्तम भविष्य घडवणारे नागरी बनतील. त्यांना सतत महापुरुषांच्या जीवनाची पुस्तके हातात देऊन त्यांच्या चरित्राचे चिंतन मनन करावयास लावून आजच्या मोबाईल डी.जे. च्या जमान्यात महापुरुषांना केवळ डोक्यावर घेऊन न नाचता महापुरुषांचे विचार डोक्यात पक्के ठेवून आपले जीवन जगले पाहिजे असे आवाहन केले.



महाराष्ट्र हाऊसिंग कॉलनी धानोरा रोड बीड येथे जयंत वासनिक यांनी आपल्या बालमित्रांबरोबर १९ तारखेला शिवजयंती मोठ्या उत्साहात डीजेच्या तालावर न नाचता सामाजिक उपक्रमाने संपन्न करून १००० रुपये शिल्लक उरलेली रक्कम महामानव अभिवादन ग्रुपच्या शालेय साहित्य वाटपाला दान दिली. त्याबद्दल सर्व बालकांचे कौतुक करून मान्यवरांच्या हस्ते सिद्धेश्वर सिरसीकर, शौर्य पिंगळे, श्रीजय पिंगळे अभिजीत कांबळ, अभिजीत कांबळे यांचा पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला.

महिला दिनाचे औचित्य साधून सुमन जोगदंड, रमाबाई जोगदंड, जलसाबाई इनकर, शांताबाई वाघमारे, कमलबाई जोगदंड, सविता जोगदंड, निलावती जोगदंड, नागोबा गल्ली येथील या ज्येष्ठ महिलांचा ज्यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा मूळ मंत्र शिका, हा मूळ मंत्र लक्षात ठेवून अनेक काबाड कष्ट करून आपल्या मुलांना, नातवांना उच्चशिक्षण दिले. त्यांचा वाचाल तर वाचाल फिरते मोफत वाचनालया तर्फे राष्ट्रमाता जिजाऊ मासाहेब, सावित्रीबाई फुले, महाराणी येशू राणी, महाराणी ताराराणी, डॉ.एपीजे अब्दुल कलाम यांची जीवन चरित्राची पुस्तके देऊन सन्मान करण्यात आला. आईच्या स्मृतिदिनी येथून पुढेही या अभियानाला व मोफत शिकवणी वर्गाला समाजभान ठेऊन यथायोग्य मदत करत राहण्याचा दृढ निश्चय सुरेश ससाणे यांनी व्यक्त केला. तर राजू जोगदंड व प्रशांत वासनिकी यांनी मुलांसी हितगुज साधून मुलांना पुढील जीवनाच्या वाटचालीबद्दल मोलाचे मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन अँड. तेजस वडमारे यांनी केले. कार्यक्रमास श्रीराम सोनवणे, बबन जोगदंड, दीपक वाघमारे व परिसरातील महिला व विद्यार्थी बहुसंख्येने उपस्थित होते. सरणातयने कार्यक्रमाची सांगता झाली.

# चौकट मोडायला शिका : सीताताई बनसोड

केज । प्रतिनिधी

महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ व जनविकस परिवर्तन आघाडी केज यांच्या संयुक्त विद्यमाने जागतिक महीला दिनाच्या निमित्ताने केज तालुक्यातील समस्त पत्रकार बांधवांचा हॉटेल गुरुमुख बीड रोड येथे सपत्नीक सत्कार समारभ आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी केजच्या नगरध्यक्षा सौ. शिताताई बनसोड या होत्या.



आपल्या अध्यक्षीय भाषणाच्या सुरुवातीला त्यांनी सर्व महिलांना जागतिक महीला दिनाच्या शुभेच्छा दिल्या. महिलांना ३६५ दिवस मान सन्मान मिळाला पाहिजे. कारण महिलांवर कुठलीही जबाबदारी टाका ती यशस्वीपणे पार पाडते. ती डॉक्टर आहे. अधिकारी आहे याचा कुठलाही गर्व ती बाळगत नाही. आत्ता मी मोठ्या हुद्द्यावर आहे म्हणून स्वयंपाक करणार नाही असं ती कधीच म्हणणार नाही. महिला घरामध्ये उत्कृष्ट शिक्षक, उत्कृष्ट इंजिनियर, उत्कृष्ट व्यवस्थापक, उत्कृष्ट अर्थमंत्री आहेत. बाजारासाठी जर त्यांच्याकडे दोनशे रुपये दिले तर ती १८० रुपये खर्च करते व २० रुपये वाचवते. एकही महिला अशी भेटणार नाही की जी २२० रुपये खर्च करून येते.

पुढे बोलतांना त्या म्हणाल्या, आजपर्यंत महिलांवर जो अन्याय अत्याचार होत आलेला आहे, तो पितृसत्ताक व्यवस्थेने केलेला आहे. तो पुरुषप्रधान व्यवस्थेने केलेला आहे. कळत नकळत ती व्यवस्था आपल्या डोक्यात असल्यामुळे आपल्याकडून महिलांवर जो अन्याय होतो तो टाळला पाहिजे. त्याचे भान आपलयाला असले पाहिजे, त्यातूनच हि व्यवस्थ बदलेल आणि महीला सक्षम होतील. कोणताच माणूस हा वाईट नसतो. विकृती वाईट असते. माणसातील विकृती नष्ट करण्यासाठी प्रत्येकाने प्रयत्न केले पाहिजेत. पत्रकार म्हणून आपली जबाबदारी जास्त आहे. डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर हे स्त्रियांच्या हक्कांसाठी लढले. हिंदू कोड बिल तयार करून महिलांना संविधनिक अधिकार प्रदान केले. महिलांना संपत्तीमध्ये अधिकार मिळाला पाहिजे, महिलांना शिक्षणामध्ये अधिकार मिळाला पाहिजे, महिलांना स्वतःचा 'वर' निवडीचा अधिकार मिळाला पाहिजे. यासाठी २५ डिसेंबर १९२७ रोजी मनुस्मृतीचे दहन केले ज्यामध्ये स्त्रियांना हीन दर्जा देण्यात आलेला होता. पुढे महिलांचे सर्व अधिकार सांविधनिक पद्धतीने संविधानाच्या माध्यमातून महिलांना प्रदान करण्यात आले.

महिलांना त्यांचे अधिकार दिले जात नव्हते या गोष्टीवरून डॉक्टर बाबासाहेब आंबडकरांनी भारताच्या कायदेमंत्रीपदाचा राजीनामा दिला. 'एक मत एक अधिकार' याप्रमाणे महीला, पुरुष, गरीब, श्रीमंत या प्रत्येकाच्या मताची किंमत ही सारखीच असेल अशी व्यवस्था बाबासाहेबांनी या देशाला संविधानाच्या माध्यमातून दिली. प्रबळ असणाऱ्या अमेरिका इंग्लंड या देशांमध्ये तो अधिकार महिलांसाठी नव्हता. महिलांनी स्वतःला कधीच कमी समजू नये. ज्या ज्या वेळेला महिलांना संधी मिळालेली आहे त्यांनी त्या संधीच सोनं केलेलं आहे. प्रत्येक संधीला न्याय देण्याचं काम महिला करत आहेत.

पुढे बोलताना सौ. शीताताई बनसोड म्हणाल्या की तशी संधी मलाही मिळाली अडीच आणि अडीच अशी पाच वर्षे केजचे नगराध्यक्ष पद भूषविण्याची संधी मला या ठिकाणी मिळाली. यापुढे महिलांनी स्वतःसाठी जगायला शिका स्वतःवर प्रेम करायला शिका स्वतःच्या आरोग्याची काळजी घ्या महिलांचे आरोग्य चांगलं राहिला तर घरातील सर्वांचा आरोग्य चांगले राहते. कारण घरामधला खरा कर्ता महिलाच असते. आपल्या मधल्या क्षमता ओळखा, आपल्याला काय करायचे असेल तर ते बोलून दाखवा. जीवणाच्या या प्रवाहामध्ये कुठेही मागे राहू नका. बंधनात राहू नका. 'चौकट मोडायला शिका' परंतु हे करत असताना आपल्याला दिल्या गेलेल्या स्वातंत्र्याचा गैरफायदाही होणार नाही याचीही काळजी घ्या, असे परखड मत यावेळी बोलताना सौ. शीताताई बनसोड यांनी व्यक्त केले.

# आदर्श शिक्षिका दैवशाला सिरसट स्त्रीरत्न राज्यस्तरीय पुरस्काराने सन्मानित



केज । प्रतिनिधी


तालुक्यातील तांबवा येथील गणेश विद्यालयाच्या सहशिक्षीका दैवशाला रावण सिरसट यांना आदर्श शिक्षिका स्त्री रत्न राज्यस्तरीय पुरस्कार जाहीर होऊन तो बीड येथे जागतिक महिला दिनी प्रमुख मान्यवरांच्या हस्ते त्यांना सन्मान पत्र देऊन बीड येथे सन्मानीत करण्यात आले. त्यांच्या शिक्षण संस्थेचे अध्यक्ष, सचिव व मुख्याद्यापक, शिक्षक सहकारी आणि नातेवाईक मंडळी कडून सिरसट मॅडम यांचे अभिनंदन केले जात आहे.

महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ, मुंबई दै. समर्थ राजयोग आणि आश्रय सेवा केंद्र, बीड यांच्या संयुक्त विद्यमाने दिले जाणारे २०२५ चे विविध पुरस्कर जाहीर झाले. त्यातील महत्वाचा आदर्श शिक्षीका स्त्रीरत्न राज्यस्तरीय पुरस्कार हा केज तालुक्यातील तांबवा येथील गणेश विद्यालयाच्या सहशिक्षीका दैवशाला रावण सिरसट यांना जाहीर झाला होता. जागतिक महिला दिन दि.८ मार्च शनिवार रोजी हॉटेल निलकमल, नगर रोड बीड येथे आयोजित केलेल्या कार्यक्रमाचे अध्यक्ष निवासी जिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी हे प्रमुख होते. व्यासपिठावर माजी आ. ड. उषाताई दराडे, बीड जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. अशोक थोरात, संपादक संतोष मानूरकर, प्रशिक्षणार्थी पोलीस उपाधीक्षक पूजा पवार, कार्यकारी अभियंता कृष्णा पानसंबळ, स्थानिक गुन्हे अन्वेषण विभागाचे पोलीस निरीक्षक उस्मान शेख, बीडचे गटशिक्षणाधिकारी खान समंदर हमीद खान, ज्येष्ठ महिला उद्योजक निर्मलाताई खटोड, केजच्या नगराध्यक्षा सीताताई बनसोड, केज जनविकास आघाडीचे प्रमुख हारूण भाई इनामदार, प्रसिद्ध उद्योजक गौतम शेठ खटोड, शहर वाहतूक शाखेचे पोलीस निरीक्षक सानप, पत्रकार संघाचे प्रदेश संपर्कप्रमुख वैभव स्वामी, पत्रकार संघाच्या महिला जिल्हाध्यक्ष शेख आयेशा यांच्यासह मान्यवर व्यासपीठावर उपस्थित होते. या प्रमुख मान्यवरांच्या हस्ते आदर्श शिक्षीका दैवशाला सिरसट यांना सन्मान पत्र देऊन सन्मानित करण्यात करण्यात आले. आदर्श शिक्षिका स्त्री रत्न राज्यस्तरीय पुरस्कार हा सिरसट मॅडम यांना मिळाल्या बद्दल त्यांच्या शिक्षण संस्थेचे अध्यक्ष, सचिव, मुख्याद्यापक, सहकारी शिक्षक व नातेवाईक मंडळीकडून त्यांचे अभिनंदन केले जात आहे.

# कृष्णा कावळे (टेलर) यांना आर्थिक मदतीसाठी सहकार्य करण्यासाठी आवाहन

तलवाडा । प्रतिनिधी

तलवाडा येथील आपल्या सर्वांचा जिवलग मित्र, शांत संयमी आणि मनमिळावू वृत्ती असलेला मित्र कृष्णा कावळे (टेलर).., जो प्रत्येकाच्या सुखात आणि दुःखात नेहमी सहभागी होतो, सर्वांशी प्रेमाने आणि आपुलकीने वागत आला आहे. परंतु नशिबाने त्याच्या समोर दुःखाचा डोंगर उभा केला असून एकुलता एक मुलगा आजाराने त्रस्त आहे.



मागील वीस पंचवीस दिवसापासून गेवराई क्रिटिकल रुग्णालय, गेवराई या ठिकाणी ॲडमिट आहे... याआधी मुंबई, छत्रपती संभाजी नगर, बीड, यासह अनेक ठिकाणी उपचार घेतले. अथक प्रयत्न केले आहेत. आज परिस्थितीला जवळचे सर्व आर्थिक भांडवल त्याने मुलाच्या आजारपणात लावले असून आज ही परिस्थितीला तोंड देत आहे. त्यांची आर्थिक परिस्थिती अतिशय बिकट असल्याने सर्व मित्र परिवार यांनी त्यांना आर्थिक सहकार्य करण्याचे ठरवले असून ज्यांना जसे शक्य होईल तेवढी मदत जमा केली आहे. आपण ही आपणास जशे जमेल तसे आणि शक्य होईल तेवढी आर्थिक मदत करावी जेणे करून कावळे कुटुंबाला सहकार्य होईल.

मदतीसाठी.

नाव – श्रीकृष्ण रामभाऊ कावळे

शाखा – महाराष्ट्र ग्रामीण बँक,तलवाडा

खाते क्र. – ५४५४२०४०५९२

IFSC code -M-HG०००४५४२

फोन पे =स्र९९७०२६२६५५

गुगल पे =स्र९९७०२६२६५५

# मानवलोकच्या वतीने बचत गटाचा महिला मेळावा

अंबाजोगाई । प्रतिनिधी

मानवलोक जन सहयोग च्या वतीने महिला दिना निमित्त बचत गट महिलांचा मेळावा नुकताच घेण्यात आला. यावेळी अंबाजोगाई नगरपरिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी प्रियंका टोंगे,डॉ.अर्चना थोरात,मेघा दामा, कल्पना लोहिया आदी उपस्थित होते. प्रियंका टोंगे यांनी नगर परिषद बचत गटांसाठी कशा पद्धतीने मदत करते हे सांगून त्या मदतीचा उपयोग महिलांनी लघु उद्योग करण्यासाठी करावा असे आवाहन केले. डॉ.अर्चना थोरात यांनी महिलांशी त्यांचे शारीरिक व मानसिक आरोग्य कसे जपावे यावर संवाद साधला.



कार्यक्रमाची सुरुवात थोर सामाजिक कार्यकर्त्या स्व.प्रा.डॉ. शैला लोहिया यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून करण्यात आली. महिला दिनाच्या शुभेच्छा देत मानवलोक महिलांचे अधिकार, समानता व सशक्तीकरण यावर कायमच काम करत असल्याचे आपल्या भाषणात सुश्री मेघा दामा यांनी सांगितले. कार्यक्रमाच्या प्रास्ताविकात कल्पना लोहिया यांनी डॉ.शैला लोहिया यांनी महिलांवरील अन्याय व अत्याचाराविरुद्ध तसेच महिला सशक्तीकरणासाठी व जेंडर व इक्वॅलिटी साठी जे काम केले त्याची प्रेरणा घेऊन मानवलोक काम करीत आहे, असे सांगितले. अधिकार, समानता व सशक्तीकरण ही या वर्षीच्या महिला दिनाची थीम असून महिला आणि पुरुष यांनी मिळून ही चळवळ पुढे न्यायला हवी असेही त्यांनी सांगितले. या कार्यक्रमात अतिशय वाईट आर्थिक परिस्थितीत प्रचंड कष्ट घेऊन आपल्या दोन्ही मुलींना उच्च शिक्षण दिल्याबद्दल बोधीघाट येथील एका दांपत्याचा शाल व श्रीफळ देऊन सन्मान करण्यात आला. या कार्यक्रमासाठी स्मिता कुलकर्णी, मानवलोक समाजकार्य महाविद्यालयाचे विद्यार्थी व मानवलोक परिवारातील महिला उपस्थित होत्या. कार्यक्रमासाठी जन सहयोगचे शाम सरवदे, सावित्री सगरे, संजना आपेट व मानवलोक समाजकार्य महाविद्यालयाचे विद्यार्थी तसेच कृष्णा यांनी परिश्रम घेतले.

# कोरो एकल महिला संघटनेच्या वतीने महिलांच्या कबड्डी स्पर्धेचे आयोजन

बीड । प्रतिनिधी

कोरो एकल महिला संघटनेच्या वतीने जागतिक महिला दिनाच्या निमित्ताने महिलांच्या कबड्डी स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. या स्पर्धेत एकूण ११ महिला कबड्डी संघांनी सहभाग घेतला. स्पर्धेचे निकाल पुढील प्रमाणे – प्रथम स्थान: तुळजाभवानी महिला कबड्डी संघ बीड – ५००० रु रोख रक्कम, द्वितीय स्थान: हिरकणी महिला कबड्डी संघ – बीड ३००० रु रोख रक्कम, तृतीय स्थान: माऊली महिला कबड्डी संघ – २००० रु रोख रक्कम. सर्व विजेता संघांना ट्रॉफी, प्रमाणपत्र, आणि मेडल देऊन सन्मानित करण्यात आले. या स्पर्धेत महिलांनी मोठ्या संख्येने उपस्थित रहाणे आणि आनंद घेतला.

महिला दिनाच्या निमित्ताने बीड शहरातील पहिल्या बस चालक, मंजुषा रांजणकर यांना मान्यवरांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले. कार्यक्रमाचे उद्घाटन सीमा ओस्तवाल, संपादक वैभव स्वामी, संपादक बालाजी जगतकर, संपादक विनोद शिंदे, बीबी वैद्य आणि कोरो इंडिया च्या विनया घेवडे यांच्या उपस्थितीत झाले. महिला कबड्डी स्पर्धेची सुरुवात क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेस पुष्पहार घालून करण्यात आली. स्पर्धेचा समारोप डॉ. प्राचार्य सविता शेटे, शुभांगी कुलकर्णी, कोमल मस्के, विनयाताई आणि आत्माराम वाव्हळ यांच्या हस्ते करण्यात आला. आत्माराम वाव्हळ यांनी या स्पर्धेचे दिवसभराचे सूत्रसंचालन केले.

विशेष समर्थक व उपस्थित लोक: कोरो इंडिया टीमच्या दीपक निकाळजे, विलास मगरे, निखिल दादा, अनिता खंडागळे इत्यादी सर्व उपस्थित होते. तसेच चंपावती प्राथमिक शाळेच्या मुख्याध्यापक गंधे सर यांचे ग्राउंड उपलब्ध करून दिल्याबद्दल मनःपूर्वक आभार मानण्यात आले.या कार्यक्रमासाठी शिल्पा पंडित, पूजा काळे, आवडताई गायकवाड, अनिता ढोरमारे, छाया गोरे, रुक्मिणी नागापुरे, मंगल कानडे, कौशल्या कळसुले, तारा घोडके, लता सावंत, नौशाद सय्यद आदि संघटना च्या लिडर्स यांनी परिश्रम घेतले. या कार्यक्रमामध्ये खेळाडूंनी आणि प्रेक्षकांनी मोठ्या संख्येने उपस्थिती दर्शवली, महिला आणि पुरुष दोन्हींचा उत्साह अभिव्यक्त झाला. या स्पर्धेने महिलांच्या सामर्थ्याची आणि एकतेची गोड ओळख निर्माण केली आहे, जी निश्चितच प्रेरणादायी आहे.



श्री दत्ता ठोंबरे सर यांना वास्तुशांतीच्या निमित्ताने प्रत्यक्ष भेटून शुभेच्छा देताना वडमाऊली विद्या प्रसारक मंडळाचे अध्यक्ष, भारतीय जनता पार्टीचे कार्यकर्ते, दीप हॉस्पिटलचे संचालक डॉक्टर शशिकांत शामराव दहिफळकर दहिफळ वडमाऊलीच्या सरपंच डॉक्टर अनिता शशिकांत गदळे दहिफळकर व डोईफोडवाडी चे माजी सरपंच तात्यासाहेब डोईफोडे आणि इतर.

# नेकनूर येथील शासकीय अध्यापक विद्यालयात जागतिक महिला दिन उत्साहात साजरा

नेकनूर । प्रतिनिधी

शासकीय अध्यापक विद्यालय, नेकनूर येथे जागतिक महिला दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाचे आयोजन प्रथम वर्ष उर्दू माध्यमाच्या विद्यार्थ्यांनी केले होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सुहानी पायल होत्या, तर प्रमुख पाहुणे म्हणून पठाण सबा उपस्थित होत्या. मार्गदर्शक म्हणून प्रज्ञा काळे, शेख महेक, माधुरी बाचल, मिर्जा उमूलवरा आणि सर्वज्ञ दीक्षा यांनी सहभाग घेतला. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी डॉ. अब्दुल नजीब सर, पुजारी सर, धोंडगे सर आणि पट्टेवार सर यांनी विशेष योगदान दिले.



कार्यक्रमाची सुरुवात पठाण फिजा यांच्या कुरान पठणाने झाली, त्यानंतर सबीहा यांनी प्रार्थना (दुआ) सादर केली. स्वागतगीतही पठाण फिजा यांनी सादर केले. संपूर्ण कार्यक्रमाचे उत्कृष्ट सूत्रसंचालन जोरीशा नायाब यांनी केले. सय्यद अर्शिया यांनी कार्यक्रमाचे प्रस्ताविक सादर करत जागतिक महिला दिन साजरा करण्यामागील महत्त्व स्पष्ट केले. या कार्यक्रमात प्रमुख पाहुण्या पठाण सबा यांनी महिलांना समाजात प्राप्त असलेल्या कनिष्ठ स्थानाबद्दल भाष्य केले आणि ते कसे चुकीचे आहे हे विषद केले. त्यांनी महिलांच्या शिक्षणाच्या दुरवस्थेवरही चिंता व्यक्त केली.

मार्गदर्शक प्रज्ञा काळे यांनी महिलांच्या विकासात पुरुषांच्या सहकार्याची आणि सहभागाची मोलाची भूमिका कशी आहे हे स्पष्ट केले. सर्वज्ञ दीक्षा यांनी प्राचीन काळातील विदुषी मैत्रेयी, गार्गी यांच्याबद्दल माहिती देत, महिलांचे शैक्षणिक योगदान अधोरेखित केले. मिर्जा उमूलवरा यांनी आधुनिक काळातील स्त्रीचे महत्त्व समजावून सांगितले. माधुरी बाचल यांनी स्त्रियांसमोरील समस्यांवर प्रकाश टाकला, तर शेख महेक यांनी स्त्री समस्यांवर अधिक सखोल विचार मांडला.

कार्यक्रमाच्या दुसऱ्या सत्रात छात्राध्यापिकांनी आपले मनोगत व्यक्त केले आणि प्रेरणादायी गीत सादर केले. या सत्रात सय्यद जेबा मुबीन, मुळे सानिका, शेख सदफ जुबेर आणि कोमल सुर्वसे यांनी सहभाग घेतला. कार्यक्रमाच्या शेवटी सय्यद तमकीन यांनी आभारप्रदर्शन केले. विशेष म्हणजे, या कार्यक्रमात उपस्थित महिला अध्यापिकांना टाचपोषी देऊन त्यांचा सन्मान करण्यात आला.

कार्यक्रमाच्या शेवटी अध्यक्ष सुहानी पायल यांनी सर्व मार्गदर्शक व प्रमुख अतिथींच्या भाषणांचा आढावा घेत स्त्रियांच्या समस्यांवर उपायभ योजनांबाबत मार्गदर्शन केले. त्यांच्या समारोपात्मक भाषणाने कार्यक्रमाची सांगता एका सकारात्मक विचाराने झाली. संपूर्ण कार्यक्रम अत्यंत प्रेरणादायी आणि उत्साहवर्धक ठरला. विद्यार्थ्यांनी केलेले सादरीकरण आणि मार्गदर्शकांनी दिलेले मार्गदर्शन यामुळे उपस्थित सर्वांना नवीन ऊर्जा मिळाली. शासकीय अध्यापक विद्यालय, नेकनूर येथे महिला दिनाचा हा सोहळा संस्मरणीय ठरला.

## डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती उत्सव समिती

# भिमनगर, जगतकर गल्ली, प्रबुद्ध नगरची कार्यकारणी जाहीर







परळी । प्रतिनिधी

महामानव, विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३४ व्या जयंतीनिमित्त जयंती महोत्सव प्रत्येक वर्षी मोठ्या थाटाने साजरा करण्यासाठी भीम नगर जगतकर गल्लीच्या नूतन कार्यकारणी सर्वनामती निवडण्यात आली त्यामध्ये अध्यक्षपदी दीपक जगतकर, उपाध्यक्ष भिमराव आदोडे, सचिव प्रेम जगतकर, कोषाध्यक्ष ड. संजय जगतकर यांची निवड करण्यात आली.

सकाळी ११ बैठकीचे आयोजन केले होते. बैठक उत्तम समुद्रे यांच्या अध्यक्षतेखाली पार पाडण्यात आली. त्यामध्ये नवीन कार्यकारणी नेमण्यात आली. कार्यकारिणीतील सदस्य पुढील प्रमाणे आहेत. सदस्य पदी संकेत बनसोडे, तत्त्वशील घोडके, सुशिल समुद्रे, सुशिल घाडगे, सुरज गायकवाड, आकाश गायकवाड, सुयोग अवचारे, तुशार डोंगरे, संदेश बनसोडे, चरण पैठने, विनोद मस्के, संदीप समुद्रे तर या उत्सव समितीच्या मार्गदर्शकपदी जेष्ठ नागरिक उत्तम समुद्रे, प्रा.विनोद जगतकर, शंकर साळवे, बालासाहेब जगतकर, अनिल मस्के, मिलिंद बनसोडे, वैजनाथ जगतकर, सुर्यकांत समिंदरसवळे, मधुकर जोगदंड, संतोष आदोडे, अशोक जगतकर, रमेश जगतकर, राहुल प्रकाश जगतकर, प्रा.संघपाल समुद्रे, प्रताप समिंदर सवळे, अमर रोडे, सत्यपाल जगतकर, राज जगतकर, निलेश जगतकर, पृथ्वीराज अवचारे अभिजीत कांबळे, परमेश्वर अवचारे, करण साळवे यांची निवड करण्यात आली.

या बैठकीला विकी वावळे, नितीन घाडगे, राहुल गायकवाड, सुशील घाडगे, भीमराव आदोडे, प्रतीक केदारे, विकास जगतकर, प्रदीप जगतकर, दीपक जगतकर, आकाश गायकवाड, अभिमान घाडगे, परमेश्वर अवचारे, गौतम घाटे, यांच्यासह भीमनगर, जगतकर गल्ली, प्रबुद्ध नगर मधील युवक मोठ्या संख्येने बैठकीस उपस्थित होते. जयंती उत्सव समितीचे प्रसिद्धी प्रमुख म्हणून प्रा.बालाजी जगतकर यांची निवड करण्यात आली या बैठकीला सर्व भीमसैनिक उपस्थित होते.

# ‘खोक्या’ची हद्दपारी कोणी थांबवली?

## बीडच्या उपविभागीय अधिकाऱ्यांकडे प्रस्ताव धूळखात



बीड । प्रतिनिधी

भाजपचे आ. सुरेश धस यांचा कार्यकर्ता असलेल्या कुख्यात सतीश ऊर्फ खोक्या भोसले याला जिल्ह्यातून हद्दपार करावे, यासाठी पोलिसांनी बीडच्या उपविभागीय अधिकारी (एसडीओ) यांच्याकडे प्रस्ताव पाठविला होता. परंतु वर्षापासून त्यावर काहीही कारवाई न करता तो धूळ खात पडून आहे. त्यामुळेच खोक्याचे मनोबल वाढले आणि तो गुन्हेगारी करत राहिला, असा आरोप होत आहे. दारू, वाळू, हातभट्टी, गुटखा माफियांसह इतर गुन्हे करणाऱ्यांची कुंडली काढून पोलिसांकडून त्यांना जिल्ह्यातून हद्दपार करण्यासाठी उपविभागीय अधिकाऱ्यांकडे (एसडीओ) यांच्याकडे प्रस्ताव पाठविला जातो. परंतु, त्यांच्याकडून कारवाई केली जात नसल्याने हे प्रस्ताव धूळ खात पडून राहतात. आपले काहीच होत नाही, असे समजून हे गुन्हेगार पुन्हा गुन्हे करत राहतात. जानेवारी २०२४ ते जानेवारी २०२५ या कालावधीतील ११८ प्रलंबित प्रस्ताव असलेल्या २१ गुन्हेगारांनी जीवे मारण्याचा प्रयत्न करणे, अवैध शस्त्र बाळगणे, जबरी चोरीसह इतर गंभीर गुन्हे केल्याचे सूत्रांनी सांगितले. आ. सुरेश धस यांचा कार्यकर्ता खोक्याने देखील प्रस्ताव प्रलंबित असल्यापासून जीवे मारण्याचा प्रयत्न करण्यासह इतर गुन्हे केल्याचे सांगण्यात आले.

### काय आहे कायदा ?

महाराष्ट्र पोलिस कायदा ५६ व ५७ अंतर्गत उपविभागीय अधिकाऱ्यांकडे (एसडीएम) गुन्हेगारांचे प्रस्ताव पाठवून मान्यता घेत गुन्हेगारांना जिल्ह्यातून हद्दपार केले जाते. जे टोळी करून गुन्हा करतात अशांना महाराष्ट्र पोलिस कायदा ५५ अंतर्गत पोलिस अधीक्षक हद्दपार करतात.

### कलेक्टर सकारात्मक, एसडीओला काय अडचण?

पोलिस अधीक्षकांनी एखाद्या गुंडाचा प्रस्ताव पाठविल्यावर जिल्हाधिकारी अविनाश पाठक यांच्याकडून तातडीने कारवाई करून प्रस्ताव निकाली काढला जातो. परंतु, उपविभागीय अधिकारी हद्दपारीचे प्रस्ताव वर्ष किंवा त्यापेक्षा अधिक काळ प्रलंबित ठेवतात. त्यांनी सकारात्मक किंवा नकारात्मक कारवाई करून निर्णय घेणे अपेक्षित आहे. परंतु, तसे होताना दिसत नाही. त्यामुळेच एसडीओंना नेमकी अडचण काय? असा प्रश्न उपस्थित होत आहे. जिल्हाधिकाऱ्यांनी याचा आढावा घेणे आवश्यक आहे.

### खोक्याला कोणाचा आशीर्वाद?

खोक्याविरोधात अनेक गुन्हे असल्याने त्याला जिल्ह्यातून हद्दपार करावे, यासाठी सप्टेंबर २०२३ मध्ये पोलिस अधीक्षकांकडे प्रस्ताव पाठविला. तेथून तो आष्टीच्या उपअधीक्षकांकडे गेला, परंतु शिरूर पोलिस ठाणे हे बीड उपविभागात येत असल्याने त्यांनी तो परत एसपींकडे पाठविला. मग तो बीड उपअधीक्षक यांच्याकडे पाठवून चौकशी केली. सर्व अंतिम चौकशी करून हा प्रस्ताव मार्च २०२४ मध्ये बीडच्या एसडीओंकडे गेला. तेव्हापासून तो त्यांच्या कार्यालयात धूळ खात पडून आहे.

### हद्दपारीच्या प्रस्तावाची माहिती घेतो

“ सतीश भोसले याचा व्हिडिओ व्हायरल होताच शिरूर पोलिस ठाण्यात दोन वेगवेगळे गुन्हे दाखल झाले आहेत. त्याचा शोधही सुरू आहे. परंतु, हद्दपारीच्या प्रस्तावाची माहिती घेतो. त्यानंतरच आपल्याला प्रतिक्रिया देतो.

– नवनीत काँवत, पोलिस अधीक्षक बीड

### बीडमध्येच जास्त प्रलंबित!

बीड उपविभागात सर्वाधिक ६४ प्रस्ताव प्रलंबित आहेत. त्यानंतर पाटोदा १६, अंबाजोगाई २२, परळी ९, माजलगाव ७ यांच्याकडे प्रस्ताव प्रलंबित आहेत.

### लवकरच निर्णय होईल

“ सतीश भोसले याचा प्रस्ताव आहे. परंतु, मध्यंतरी लिपिक एसीबीच्या ट्रॅपमध्ये अडकला आणि नंतर निवडणुकाही लागल्या. परंतु, त्याला प्रलंबित म्हणता येणार नाही. लवकरच त्यावर निर्णय होईल.

– कविता जाधव, उपविभागीय अधिकारी बीड

# घरकुल योजनेत कसलाही गैरप्रकार होता कामा नये

## आ. संदीप क्षीरसागरांकडून प्रशासनाला कडक निर्देश

बीड । प्रतिनिधी

सध्या प्रधानमंत्री आवास योजना, रमाई आवास योजना यासह शासनाच्या विविध घरकुल योजनेची कामे प्रशासकीय स्तरावर सुरू आहेत. या योजनेतील लाभार्थी हे गरजू आणि वंचित असतात. गरजू आणि पात्र लाभार्थ्यांची घराचे स्वप्न पूर्ण होण्यास कसलाही प्रकारचा अडथळा होऊ नये, तसेच या योजनांच्या प्रक्रियेत कुठल्याही स्तरावर आर्थिक मागणी अथवा इतर कसलाही गैरप्रकार होऊ नये याची पुरेपूर दक्षता घ्या. तसेच पात्र लाभार्थ्यांना तातडीने घरकुल हप्ता वितरित करा, असे कडक निर्देश आ. संदीप क्षीरसागर यांनी बीड नगरपालिका, बीड पंचायत समिती व शिरूर कासार पंचायत समिती व बीड नगरपालिका येथील अधिकाऱ्यांना दिले आहेत.

सध्या प्रधानमंत्री आवास योजना ग्रामीण अंतर्गत नवीन उद्दिष्ट प्राप्त झाले आहे. त्याबाबत ग्रामपंचायत स्थळावर सध्या प्रस्ताव दाखल करून घेणे सुरू आहे. प्रधानमंत्री आवास योजना शहरीचे ऑनलाईन अर्ज दाखल करून घेण्याची प्रक्रिया झाली आहे. रमाई आवास योजनेचे प्रस्ताव ग्रामपंचायत स्तरावरून दाखल करून घेऊन पंचायत समितीमार्फत समाज कल्याण विभागाकडे दाखल करण्यात आले आहेत. तसेच त्रुटी असलेले प्रस्तावांची पूर्तता करणे सुरू आहे. बऱ्याच वेळा या योजनेतील लाभार्थ्यांकडून अधिकारी आर्थिक मागणी करत असल्याच्या तक्रारी येत असतात. जे नागरिक या योजनेचे लाभार्थी आहेत ते सर्व अति सर्वसामान्य गरीब आणि वंचित घटकातील असतात. त्यांचे अडवणूक करणे आर्थिक मागणी करणे किंवा इतर कोणत्याही प्रकारचा गैरप्रकार या योजनेच्या कार्यवाहीत होता कामा नये. तसेच जे लाभार्थी पात्र आहेत त्यांची हप्ते तातडीने वितरित करा अशा प्रकारचे कडक निर्देश आमदार संदीप क्षीरसागर यांनी बीड व शिरूर कासार तालुक्याचे गटविकास अधिकारी बीड नगरपालिकेचे मुख्याधिकारी तसेच इतर संबंधित अधिकाऱ्यांना दिले आहेत.

### बोगसगिरी आणि लाभार्थ्यांची पिळवणूक अजिबात खपवून घेणार नाही

दरम्यान, घरकुल योजनेचा लाभ घेऊन घर न बांधताच अधिकाऱ्यांच्या संगनमताने रक्कम उचलल्याचे गैरप्रकार जिल्ह्यात समोर आले आहेत. असले प्रकार बीड विधानसभा मतदारसंघ क्षेत्रात अजिबात खपवून घेणार नाही. त्यासोबतच लाभार्थ्यांची अधिकाऱ्यांकडून होणारी आर्थिक पिळवणूक सहन केली जाणार नाही. अशी तंबी ही आमदार संदीप क्षीरसागर यांनी अधिकाऱ्यांना दिली आहे.

### बीड तालुक्याने विशेष लक्ष देण्याची गरज, दिरंगाई चालणार नाही

घरकुलाचा पहिला हप्ता सोडवण्यात बीड तालुका मागे पडला आहे. बीड पंचायत समिती अंतर्गत एकूण २९२९ लाभार्थ्यांना पहिला हप्ता वितरित करण्यात आलेला नाही. त्यामुळे बीड पंचायत समितीने विशेष लक्ष देणे गरजेचे आहे. याबाबतीत दिरंगाई चालणार यासोबतच घरकुल संदर्भात बीड नगरपालिकेच्या ही अनेक तक्रारी नागरिकांमधून होत त्याची तातडीने सोडवणू प्रशासनाने करावी असेही आमदार संदीप क्षीरसागर यांनी म्हटले आहे.





## शंभर टक्के अपंग चढला बीड जिल्हाधिकारी कार्यालयाच्या भिंतीवर

बीड । प्रतिनिधी

जिल्हा रुग्णालयात मधील अपंग प्रमाणपत्रातील टक्केवारी मधील प्रकार थांबवा. जिल्हा रुग्णालयामधील अपंग बोर्डावरील डॉक्टर कट्टे हाडाचे यांची हकालपट्टी करावी या मागणीसाठी गेल्या सात दिवसापासून शरद सानप शंभर टक्के अंध व्यक्ती जिल्हाधिकारी कार्यालयासमोर उपोषणाला बसले आहेत.

उपोषणाची दखल न घेतल्यामुळे आज त्यांनी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर बांधलेल्या संरक्षण भिंतीवर चढून जीव देण्याचा प्रयत्न केला. सामाजिक कार्यकर्ते अनिल तुरुकमारे यांच्या मध्यस्थीने जिल्हा शल्य चिकित्सक थोरात यांची संपर्क साधल्यानंतर एका तासानंतर ते खाली उतरले परंतु उपोषण चालूच आहे ते भेटीसाठी सीएस यांच्याकडे गेले आहेत.

# रिपाइंचे जिल्हा कचेरी समोर महाबोधी विहार मुक्तीसाठी तीव्र निदर्शने

## बौद्ध विहार आमचेच, म्हणून हिंदू महंतांनी कब्जा सोडावा

बीड । प्रतिनिधी

बिहार राज्यातील बोधगया येथील महाबोधी बौद्ध विहार कायदा १९४९ रद्द करुन महाबोधी बौद्ध विहार बौद्ध समाजाच्या ताब्यात देण्यात यावे. या मागणीसाठी रिपाइंकडून बीड जिल्हाधिकारी कार्यालयासमोर सोमवार (दि.१०) मार्च रोजी सकाळी ११:०० वाजता तीव्र निदर्शने करण्यात आली. सदरील निदर्शने रिपाइंचे अध्यक्ष तथा सामाजिक न्याय मंत्री रामदास आठवले,युवा रिपाइं प्रदेशाध्यक्ष तथा बीड जिल्हाध्यक्ष पप्पु कागदे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली.

बीड जिल्हाधिकारी यांना दिलेल्या निवेदनात म्हंटले आहे की, महाबोधी बौद्ध विहारास जागतिक वारसा स्थान म्हणून ओळखले जाते.शाक्य वंशाचे राजकुमार सिद्धार्थ गौतमांना या ठिकाणी पूर्णज्ञान (संबोधी/बुद्धत्व) प्राप्ती होऊन ते सम्यक संबुद्ध’ बनले, व ‘बुद्ध’ म्हणून सर्वत्र ओळखले जाऊ लागले. असे असतांना तेथील बौद्ध विहाराचा ताबा हा हिंदूकडे



आहे.त्यामुळे हे बौद्ध विहार बौद्धांच्या ताब्यात देण्यात यावे.यासाठी जगभरातील बौद्ध समाज बिहार येथील बौधगया येथे एकत्रित आलेले आहेत. त्या अनुषंगाने देशात आणि राज्यात रिपाइं अध्यक्ष मंत्री रामदास आठवले, युवा रिपाइं प्रदेशाध्यक्ष पप्पु कागदे यांच्या मार्गदर्शनाखाली निदर्शने केली जात आहेत. बीडमध्ये सोमवारी निदर्शने होवून, त्यानंतर तालुका पातळीवरही निदर्शने केली जाणार आहेत.

यावेळी राजू जोगदंड, किशन तांगडे, मझर खान, बापू पवार, अरुण कांबळे, शाहू डोळस, मायाताई मिसळे, अविनाश जोगदंड, रेश्माताई जोगदंड, संगीता जाधव, अरुणा निर्मळ, शोभा गलांडे, अनिता तुरुकमारे, माया वाघमारे, जया शिंदे, माया साबळे, लता भालेराव,बाळासाहेब गव्हाणे, सुभाष तांगडे, भैय्या मस्के, भाऊसाहेब कांबळे, धम्मा पारवे, देवानंद वाघमारे, संभाजी गायकवाड, राहुल कांबळे, महेंद्र वडमारे, कुमार अरुण, नवनाथ डोळस, भास्कर जावळे, बाजीराव वाघमारे, मनोज बोराडे, राजाभाऊ वक्ते, रमेश जावळे, गौतम कोरडे, मंगेश पवार, कैलास जोगदंड, कोकाटे, संजय हनवते, शाम वीर, अप्पा मिसळे, राम इगवे, रामेश्वर खळगे, समाधान गवळी, विशाल इंगोले, आप्पा पवार, विशाल वक्ते, श्रीमंत जाधव, गौतम कांबळे, दीपक कांबळे, बंडू ठोंबरे, महादेव इनकर, विकास ओव्हाळ, ज्ञानोबा माने, जितू धन्वे, भीमराव घोडेराव यांच्यासह रिपाइं पदाधिकारी, कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### सत्याचा इतिहास कोणालाही पुसता येणार नाही!

१८८० च्या दशकात, भारतावर राज्य करणाऱ्या ब्रिटिश सरकारने सर अलेक्झांडर कनिंगहॅम यांच्या मार्गर्शनाखाली महाबोधी विहाराचा जीर्णोद्धार केला. यानंतर काही दिवसांनी इ.स. १८९१ मध्ये श्रीलंकेतील बौद्ध नेते अनागरिक धर्मपाल यांनी या विहाराचा ताबा हिंदूंकडून बौद्धांकडे परत द्यावा या मागणीसाठी एक मोहिम सुरू केली. हिंदू महंतांनी यावर आपेक्ष घेतला पण मोहिम सुरूच ठेवली गेली. इ.स. १९४९ साली या मोहिमेला काही प्रमाणात यश आले; कारण तेव्हा विहाराचा ताबा हिंदू महंतांकडून काढून घेऊन बिहार सरकारकडे देण्यात आला आणि या सरकारने ‘मंदिर व्यवस्थापन समिती’ स्थापन केली. या समीतीत ९ सदस्य होते आणि अध्यक्षासह जास्त सभासद हिंदू होते. म्हणजेच या विहाराचा ताबा हिंदूंकडेच होता.

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक दीपक इंदर थोरात यांनी निर्मिती प्रिंटस्, धोंडीपुरा, टिळक रोड, जोशी नर्सिंग होमसमोर, बीड ता.जि.बीड-४३११२२ येथे छापुन कार्यालय सायं.दैनिक महाराष्ट्र आरंभ, घर नं.१-७-३८१,जुन्या पोलीस अधीक्षक कार्यालयाजवळ, थोरातवाडी बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक - दीपक इंदर थोरात

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER DEEPAK INDAR THORAT AT THE NIRMITI PRINTS,TILAK ROAD , DHONDIPURA, IN FRONT OF JOSHI NURSING HOME, BEED, TQ.BEED DIST.BEED-431122 (MH) AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAILY EVENING MAHARASHTRA AARAMBH , H.NO.1-7-381, NEAR OLD S.P. OFFICE,THORATWADI, BEED TQ.DIST.BEED -431122 EDITOR - DIPAK INDAR THORAT